गडहिंग्लज पंचायत समिती (जि. कोल्हापूर) प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः पंसई-२०१६/प्र.क्र.२५८/बांधकाम-४
२५ मर्झबान पथ, बांधकाम भवन,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
तारीख: ०६ जानेवारी, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय, ग्रा.वि.व ज.सं.वि.क्र.पंसई-२००९/प्र.क्र.१३/पंरा-७, दि. २९ जानेवारी, २०१०

२) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., कोल्हापूर यांचे पत्र क्र.जिप/बांखा/प्रकल्प-१/२३२९/१६, दि. १४.१०.२०१६, क्र. जिप/बांखा/प्रकल्प-४/९६४/१६, दि.१४.१२.२०१६ , क्र. जिप/ बांखा/ प्रकल्प-१/६०५/१७, दि.२९.०५.२०१७ व क्र. जिप/बांखा/प्रकल्प-१/१२३५/१७, दि.१८.०९.२०१७

प्रस्तावना :-

१. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी वरील पत्रान्वये गडहिंग्लज पंचायत समिती (जि. कोल्हापूर) प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली आहे.

२. गडहिंग्लज पंचायत समिती (जि. कोल्हापूर) प्रशासकीय इमारतीच्या रु. १,५९,८६,०००/- किंमतीच्या सविस्तर अंदाज पत्रकास दिनांक २९.०१.२०१० च्या शासन निर्णयान्वये रु. १५९.८६ लक्ष इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली असून प्रशासकीय मान्यते इतका पुर्ण निधी जिल्हा परिषदेला वितरीत करण्यात आलेला आहे. गडहिंग्लज पंचायत समिती (जि. कोल्हापूर) प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाची प्रशासकीय मान्यता सन २००८-०९ च्या दरसूचीवर आधारीत होती. त्यानुसार, या कामास तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आल्यानंतर कामाची निविदा काढण्यात आलेली असून ती सन २०१०-११ च्या मंजूर दरसूचीशी तुलना करुन ११.२२ % इतक्या जादा दराने मंजूर करण्यात आलेली आहे. सदर दर सन २०१०-११ च्या दरसुचीवर १.४९ % जादा दराने आहे. कामाच्या निविदेमध्ये दरवाढीचे कलम सामाविष्ठ करण्यात आलेले होते. तांत्रिक मान्यतेनंतर दिनांक २१.०१.२०११ रोजी कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात आले. तथापि, नियोजित बांधकामाच्या ठिकाणी असलेल्या गोडाऊनच्या जुन्या इमारततीचे बांधकाम काढण्यास वेळ लागल्यामुळे तसेच, बांधकामाच्या जागेत असलेली नगरपालिकेची वेस्ट वॉअर पाईप लाईन अन्य ठिकाणी स्थलांतरीत करण्यास विलंब झालेला आहे. सदर पाईप लाईनचे स्थलांतरण मे- २०११ मध्ये करण्यात आल्यानंतर मे-२०११ मध्ये प्रत्यक्षात काम सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे, काम सुरु करण्यास जवळ जवळ ३ महिन्यांचा विलंब झाला आहे. या विलंबास विभाग/कंत्राटदार जबाबदार नाहीत. सद्य:स्थितीत प्रशासकीय बांधकाम पुर्ण झालेले असून, इमारत वापरात आहे. कामाची निविदा जादा दराने मंजूर असल्याने व भाववाढ बाबींसाठी जादा खर्च होत असल्याने गडहिंग्लज पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारत बांधकामाच्या खर्चात एकूण रु. २३,३६,०००/- इतकी वाढ (१४.६१%) झालेली आहे. त्यामुळे अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी संदर्भीय पत्रान्वये रु. १,८३,२२,०००/- इतक्या रकमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली आहे.

३. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., कोल्हापूर यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या छाननी अंती गडहिंग्लज पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाकरीता रुपये रु. १,८३,२२,०००/- इतक्या रक्कमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

४. गडहिंग्लज पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या मुळ प्रशासकीय मान्यता रुपये १,५९,८६,०००/- रक्कमेमध्ये रुपये २३,३६,०००/- इतकी वाढ करुन रुपये १,८३,२२,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी त्र्याऐंशी लक्ष बावीस हजार फक्त) इतक्या रक्कमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास, या शासन निर्णयान्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

५. गडहिंग्लज पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या मुळ प्रशासकीय व सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकाचा तुलनात्मक गोषवारा खालील प्रमाणे आहे:-

पंचायत समिती गडहिंग्लज प्रशासकीय इमारतीच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा तुलनात्मक गोषवारा

अ. क्र.	बाबीचा तपशिल	मुळ प्रशासकीय मान्यतेनुसार रक्कम (रु.)	सुधारीत प्रशासकीय मान्यता रक्कम (रु.)	बचत रक्कम (रु.)	अतिरिक्त रक्कम (रु.)
१	२	३	४	५	६
१	स्थापत्य काम	१२२०२८३०.००	-	-	-
२	पाणी पुरवठा व मल:निस्सारण	९७६२२६.००	-	-	-
	एकूण (१+२)	१३१७९०५६.००	१३२३३४२६.००	-	५४३७०.००
३	विद्युतीकरण	१३४२३११.००	११४८७१४.००	१९३५९७.००	-
४	दर भाववाढ	७३२१७०.००	१७४८५४५.००	-	१०१६३७५.००
५	आकस्मिक खर्च	४८८११३.००	४८८११३.००	-	-
६	संगणकीकरण	२४४०५७.००	२४४०५७.००	-	-
७	निविदा अधिक्य	०.००	१४५८८०९.००	-	१४५८८०९.००
	एकूण	१५९८५७०७.०० @१५९८६०००.००	१८३२१६६४.०० @१८३२२०००.००	१९३५९७.००	२५२९५५४.००
	अतिरिक्त(६-५)			१४.६१%	२३३५९५७.०० @ २३३६०००.००

६. उपरोक्त प्रशासकीय इमारत बांधकामासाठी संबधित सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतरच सहायक अनुदान स्वरुपात टप्प्या-टप्प्याने, उपलब्धतेनुसार अर्थसंकल्प वितरण प्रणाली (BDS) द्वारे निधी वितरीत करण्यात येईल. या कामी वितरीत करण्यात आलेला रु. १५९.८६ लक्ष निधी वजा जाता उर्वरीत रु. २३.३६ लक्ष इतका निधी जिल्हा परिषदेला देय राहील.

७. प्रस्तुत कामात पुन:श्च कोणतीही भाववाढ यापुढे देय होणार नाही. सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत लेखे अंतिम करण्यात यावेत.

८. या कामावरील खर्च हा "२५१५-इतर ग्रामीण विकास कार्यक्रम, १०१ पंचायती राज ३१ सहाय्यक अनुदाने (०१) (०३) जिल्हा परिषदांच्या इमारती बांधकामासाठी जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने (२५१५ ००५३)" या लेखाशिर्षाखाली मंजूर केलेल्या तरतूदीमधून खर्ची टाकण्यात यावा.

९. प्रस्तुतचा शासन निर्णय, वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग- पाच, अ.क्र.९ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परि.क्र.१३४, स्तंभ ५ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारास अनुसरुन अनुसरून निर्गमित करण्यांत येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०१०५१७१७५२४८२० आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dilip Babasaheb Patil

Digitally signed by Dilip Babasaheb Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e461e0a32ec649f0a60e4372f7cbbb3edff433d33cc0d95db6f8dbf1fa4f7f, cn=Dilip Babasaheb Patil
Date: 2018.01.06 13:26:34 +05'30'

(दि.बा.पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. विरोधी पक्ष नेता विधानसभा/ विधानपरिषद
२) विभागीय आयुक्त पुणे विभाग, पुणे
३) महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२, नागपूर.
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर
५) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर
६) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर
७) कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद कोल्हापूर
८) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोल्हापूर
९) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
१०) उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
११) जिल्हा लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोल्हापूर
१२) सभापती, पंचायत समिती, गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर
१३) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर
१४) वित्त विभाग - (व्यय-१५, अर्थ सं. -२) , मंत्रालय मुंबई ४०० ०३२
१५) नियोजन विभाग (का-१४४४) , मंत्रालय मुंबई ४०० ०३२
१६) सार्वजनिक बांधकाम विभाग, इमारती-३, मंत्रालय मुंबई ४०० ०३२
१७) निवड नस्ती कार्यासन बांधकाम-४, ग्रा.वि.व ज.सं.विभाग, बांधकाम भवन मुंबई